# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २१८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.२९ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## वादग्रस्त विधानांप्रकरणी नितेश कराळे मास्तरांना वर्धा पोलिसांकडून अटक

नागपूर दि.२८ (प्रतिनिधी)- भारतीय न्यायव्यवस्थेबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य असलेला व्हिडीओ समाजमाध्यमावर प्रसारित केल्याच्या आरोपावरून नितेश कराळे यांच्याविरोधात वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या गोपनीय शाखेतील कर्मचाऱ्याने समाजमाध्यमावरील निरीक्षणादरम्यान हा व्हिडीओ पाहिल्यानंतर तक्रार केली. याशिवाय कराळे मास्तर यांनी कुंभमेळा आणि आरक्षण हटाव मोहिमेविरोधात व्हिडिओ बनवून अक्षय पर्यवक्तव्य केल्याचा आरोप करत त्यांना वर्धा पोलिसांकडून अटक करण्यात आलेली आहे. नितेश कराळे मास्तरांनी आगामी नाशिक कुंभमेळ्याच्या खर्चावर प्रश्न उपस्थित करत, कुंभमेळ्यासाठी होणारा तब्बल २५ हजार कोटी रुपयांचा खर्च हा अनावश्यक असल्याचे म्हटले होते. तसेच कुंभमेळ्यात येणारे साधू गांजा सेवन करण्यासाठी येतात, असा कथित आक्षेपार्ह उल्लेख त्यांनी केला होता. या वक्तव्यावरून विश्व हिंदू परिषदेसह हिंदू संघटनांनी आक्षेप घेत पोलिसांत तक्रार दाखल केली होती.'' नितेश कराळे मास्तर यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे निर्माण झालेला वाद आता पुन्हा चर्चेत आला आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर साधू-संतांबाबत केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यामुळे यापूर्वीच त्यांच्या विरोधात तक्रार व अजामीनपात्र गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त समोर आले होते. या प्रकरणामुळे त्यांच्यावर मोठी टीका झाली होती. दरम्यान, ३१ जुलै २०२६ रोजी 'आरक्षण हटाव' या विषयावर सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या व्हिडिओतील कथित आक्षेपार्ह वक्तव्यावरून कराळे मास्तरांविरोधात पुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात तक्रार झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला.






## नेपाळमधील महापुरातील मृतांची संख्या वाढल्याने शवागरेही भरली

### मृतदेह जतन करण्यासाठी ड्राय आईससह रिकाम्या इमारतींचा वापर

काठमांडू दि.२८ (वृत्तसंस्था)- नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या भीषण पुरानंतर मृतांची संख्या वाढत असतानाच प्रशासनासमोर आता मृतदेह सुरक्षित ठेवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. विविध जिल्ह्यांमधील शवागरांची क्षमता संपत असून, पुराच्या पाण्यात वाहून गेलेले मृतदेह रासुवा आणि नुवाकोटपासून दूरच्या चितवन, तनाहुन, गोरखा आणि नवलपरासीपर्यंत आढळत आहेत. याबद्दल सविस्तर वृत्त हिंदुस्थान टाइम्सने दिले आहे.

या पुरात आतापर्यंत किमान ५३८ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. वाढत्या मृतदेहांमुळे प्रशासनाने शेजारील जिल्ह्यांमध्ये मृतदेह हलवण्यास सुरुवात केली असून, काही ठिकाणी रिकाम्या इमारतींचे तात्पुरत्या शवागरांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. नुवाकोट, धादिंग आणि नवलपरासी येथील शवागरांची क्षमता अपुरी पडू लागल्याने मृतदेह पोखरासह इतर जिल्ह्यांमध्ये पाठवले जात आहेत. मात्र पोखरातील रुग्णालयांवरही आता क्षमतेपेक्षा जास्त मृतदेह ठेवण्याची वेळ आली आहे.

चितवनमध्ये रुग्णालयांच्या शवागरांमध्ये जागा अपुरी पडू लागल्याने भरतपूरमधील वापरात नसलेल्या एका इमारतीचे मृतदेह ठेवण्याचे तात्पुरत्या केंद्रात रूपांतर केले आहे. चितवनचे मुख्य जिल्हाधिकारी गणेश आर्याल यांच्या माहितीनुसार, जिल्ह्यातील रुग्णालयांच्या शवागरांमध्ये केवळ ३० ते ५० मृतदेह ठेवता येतात. नव्या तात्पुरत्या केंद्रात सुमारे २५० मृतदेह ठेवण्याची व्यवस्था केली जाणार आहे. जर ही जागा अपुरी पडल्यास देवघाट येथील विद्युत स्मशानभूमी वापरण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. भरतपूर महानगरपालिका या सुविधेची दुरुस्ती करून तेथे एअर कंडिशनर बसवणार असून, मृतदेह कुजण्याची प्रक्रिया मंदावण्यासाठी ड्राय आईसचा वापर केला जाणार आहे.

पोखरा अकादमी ऑफ हेल्थ सायन्सेसचे माहिती अधिकारी (पान ४ वर)

## एकही मागणी मागे घेणार नाही; आंदोलन टोकाचे होणार; मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

जालना दि.२८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांच्या अंमलबजावणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारविरोधात पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला आहे. उद्यापासून अंतरवाली सराटी येथे होत असलेल्या आंदोलनातून एकही मागणी मागे घेणार नाही. मी कोणत्याही संकटाला सामोरे जाण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहे. सरकारने वेळेत मागण्या पूर्ण केल्या नाहीत, तर हे आंदोलन अत्यंत टोकाचे होईल आणि त्यानंतर लाखो गाड्यांसह आम्ही मुंबईकडे कूच करू,'' असा सज्जड इशारा जरांगे पाटील यांनी दिला. अंतरवाली सराटी येथे शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

कुणबी नोंदी सापडूनही प्रत्यक्ष प्रमाणपत्रे दिली जात नसल्याचा गंभीर आरोप करत जरांगे पाटील म्हणाले, ''प्रशासनातील अधिकाऱ्यांनी अनेक भागांत अर्ज स्वीकारणे बंद केले आहे आणि आता वरिष्ठ पातळीवर अर्ज येत नसल्याचे सांगून समाजाची दिशाभूल केली जात आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत पण दाखला मिळाला नाही, त्यांनी थेट अंतरवाली सराटीत येऊन आपले अर्ज द्यावेत. जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जात पडताळणी समितीच्या अधिकाऱ्यांना अंतरवालीत एकत्र बसवून प्रमाणपत्रे का दिली जात नाहीत, याचा जाब सरकारने विचारावा आणि स्पष्ट अंमलबजावणी करावी.''

जरांगे पाटील यांनी मराठवाड्यासह विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि खानदेशातील मराठा बांधवांना अंतरवाली सराटी येथे येण्याचे आवाहन केले आहे. ज्या मराठा बांधवांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, ज्यांनी कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत, ज्यांचे अर्ज स्वीकारले गेले नाहीत किंवा ज्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले आहे; मात्र त्यांना व्हॅलिडिटी मिळालेली नाही, अशा सर्वांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. 'आताच निघा आणि सकाळी अंतरवालीत पोहचा,' असे आवाहन करत त्यांनी आंदोलनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

अंतरवाली सराटी येथे मोठ्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा मागविल्याचा दावा करत जरांगे पाटील यांनी सरकारला थेट सवाल केला. 'फडणवीसांना काय मराठ्यांसोबत कुस्ती खेळायची काय? पुन्हा रक्ताचा चिखल करायचा का?' असे प्रश्न उपस्थित करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. सरकारने आंदोलनाची दखल घेतली नाही तर पुढील लढ्याची तयारी ठेवावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

शासनाकडून चर्चेसाठी संपर्क झाल्याचा दावा करत जरांगे म्हणाले, ''मला सरकारकडून फोन आले होते; मात्र मला केवळ पोकळ आश्वासने नको, प्रत्यक्ष अंमलबजावणी हवी आहे. यावेळी आंदोलन करण्यासाठी आम्ही आझाद मैदानात जाणार नाही, तर थेट मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानावर जाऊन ठाण मांडणार.'' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठा उपसमितीवर टीका करताना त्यांनी उपसमितीच्या सुस्त कामकाजावर नाराजी व्यक्त केली, तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दाव्यांचाही समाचार घेतला.

## झेरॉक्स दुकानात ३,५०० एसआयआर फॉर्म, भाजप कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल; रोहित पवारांची निवडणूक आयोगाकडे मागणी

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील खारघरमध्ये एसआयआर फॉर्मवरून राजकीय राडा झाल्याची घटना समोर आली आहे. एका झेरॉक्स दुकानात हजारो एसआयआर फॉर्म झेरॉक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दुकानात धाव घेतली. यावेळी हे फॉर्म झेरॉक्ससाठी घेऊन आलेला व्यक्ती भाजपचा युवा पदाधिकारी असल्याचे समोर आले. याप्रकरणी, ४ बीएलओंना निलंबित करण्यात आलं असून पोलिसांनी गुन्हा देखील दाखल केला आहे. मात्र, यात केवळ बीएलओंना निलंबित करून भागणार नाही, तर त्यांना आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केलीय.

खारघरमधील एका झेरॉक्स दुकानात हजारो एसआयआर फॉर्म झेरॉक्स केले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दुकानात धाव घेतली. त्यावेळी, ठाकरे गट आणि भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये झटापट झाली. खारघर पोलिस या प्रकरणाची दखल घेत नसल्याने पोलीस ठाण्यात ठाकरे गटाने ठिय्या आंदोलन केले. अखेर भाजप कार्यकर्ता सुरज पाटील याच्यावर खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. पाच बीएलओ प्रतिनिधींना रायगड जिल्हाधिकारी यांनी निलंबित केले आहे. भाजप कार्यकर्ता सुरज पाटील याच्याकडून ३५ हजार एसआयआर अर्ज ताब्यात घेवून सील करण्यात आले आहेत. याप्रकरणात ४ बीएलओ यांना निलंबित केल्याचं कळतंय. पण, फक्त बीएलओ यांना निलंबित करून भागणार नाही, तर त्यांना आदेश देणारे अधिकार कोण आहेत? तेही निलंबित झाले पाहिजेत आणि भाजप कार्यकर्त्यावरही कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केली. महत्त्वाचं म्हणजे जागरुक नागरिकांमुळं हा प्रकार उघडकीस आला म्हणून लाजेखातर ही कारवाई केली असेल, पण असे अनेक प्रकार जे उघड झालेले नाहीत त्याचं काय? हाही प्रश्न आहे आणि निवडणूक आयोगाने याचं उत्तर दिलं पाहिजे, अशी मागणीही रोहित पवारांनी केली.

## साखरेचे भाव २० टक्क्यांनी घसरल्याने ग्राहकांना दिलासा

नवी दिल्ली दि.२८ (वृत्तसंस्था)- साखरेच्या दरात झालेल्या मोठ्या वाढीमुळे देशात साखरेच्या उपलब्धतेबाबत चिंता निर्माण झाली होती. त्यानंतर, आता साखरेचे भाव कमी होऊ लागले आहेत. सरकारने २८ ऑगस्ट रोजी सांगितले की, गेल्या काही दिवसांत कारखान्यातील साखरेचे दर सुमारे २० टक्क्यांनी घसरले आहेत, तर किरकोळ दरातही घट होऊ लागली आहे.

सरकारने अलीकडील भाववाढीचे मुख्य कारण प्रत्यक्ष तुटवडा नसून, साठेबाजी आणि सट्टेबाजी असल्याचे म्हटले आहे. देशभरातील कारखान्यांमधील साखरेच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केली असता, पुरेसा साठा असल्याचे आढळून आले आहे. तसेच काही कारखान्यांकडे त्यांनी त्यांच्या मासिक विवरणपत्रात घोषित केलेल्या साखरेपेक्षा जास्त साखर असल्याचेही आढळले आहे. साखरेच्या साठ्याचा कृत्रिम तुटवडा टाळण्यासाठी, सरकार सप्टेंबरपासून साखरेच्या सध्याच्या मासिक कोटा पद्धतीऐवजी पंधरवड्यानुसार वाटप करण्याची पद्धत लागू करणार आहे. या नवीन पद्धतीनुसार, साखर कारखान्यांना त्यांच्या वाटपापैकी किमान ४०टक्के साठा पहिल्या आठवड्यात आणि उर्वरित साठा त्यानंतरच्या आठवड्यात विकावा लागेल. सरकारचे म्हणणे आहे की, या पद्धतीमुळे मागणी आणि पुरवठ्यावर अधिक बारकाईने लक्ष ठेवणे, बाजारातील बदलत्या परिस्थितीवर तत्काळ पाऊल उचलणे आणि गरज भासल्यास अतिरिक्त कोटा उपलब्ध करून देणे शक्य होईल.

## नेत्यांना शिव्या देणे आणि स्वत:चे नाव मोठे करण्यासाठीच मनोज जरांगे पाटलांचे आंदोलन, भाजप आमदाराचा आरोप

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन पुन्हा एकदा वातावरण तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे उद्यापासून (२९ ऑगस्ट ) अंतरवाली सराटीत उपोषणाला सुरुवात करणार आहेत. या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येनं मराठा बांधव अंतरवाली सराटीकडे जाताना दिसत आहेत. अशातच मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर भाजप आमदार विजय रहांगडाले यांनी जोरदार टीका केली आहे. स्वतःचं नाव मोठं करण्यासाठी आणि स्वतःच्या स्वार्थासाठी जरांगे पाटील आंदोलन करत असल्याचा आरोप त्यांनी केलाय.

आंदोलन छेडणारे मनोज जरांगे पाटील यांच्यावर भारतीय जनता पक्षाचे गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा-गोरेगाव मतदारसंघाचे आमदार विजय रहांगडाले यांनी जोरदार निशाणा साधला आहे. जरांगे यांच्या आंदोलनाचा हेतू केवळ नेत्यांना शिव्या देणे आणि स्वतःचा स्वार्थ साधणे हाच असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. आमदार विजय रहांगडाले म्हणाले की, मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा मुख्य उद्देश फक्त भाजप नेत्यांना खाली दाखवणे, शिव्या देणे आणि स्वतःचे नाव मोठे करणे हाच राहिलेला आहे.

स्वतःच्या हिताकरिता आणि स्वार्थासाठी हे आंदोलन चालवले जात असल्याची टीका आमदार विजय रहांगडाले यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर केली आहे. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा उद्देश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातूनच पूर्ण होईल असेही आमदार विजय रहांगडाले म्हणाले.

## नेपाळमधून सुखरूप परतलेल्या २१ भारतीयांची मंत्री एस.जयशंकर यांनी घेतली भेट

नवी दिल्ली दि.२८ (वृत्तसंस्था) - नेपाळमधील महाप्रलयात तब्बल ५३८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर शेकडो नागरिक बेपत्ता झाले आहेत. या महापुराच्या घटनेनंतर अनेक गावं भुईसपाट झाले आहेत, तर अनेक गावांचा अद्यापही संपर्क तुटलेलाच आहे. या महापुरात शेकडो भारतीय देखील बेपत्ता झाले आहेत. सध्या नेपाळच्या सैन्यांकडून आणि पोलिसांकडून युद्धपातळीवर मदतकार्य सुरू करण्यात आलेलं आहे.

नेपाळमधील महापुरानंतर जवळपास ३२० भारतीय अद्यापही बेपत्ता आहेत, तर ४०० जण सुरक्षित असल्याची माहिती भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी दिली. पुराचा फटका बसलेल्या शेकडो भारतीय नागरिकांना पुन्हा भारतात आणण्यासाठी केंद्र सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत.

नेपाळमधील पुरामुळे बाधित झालेल्या भारतीयांपैकी २१ जण विमानाने शुक्रवारी दिल्लीत दाखल झाले आहेत. पूरस्थितीतून सुखरूप परतलेले हे २१ जण तमिळनाडूमधील आहेत. या २१ यात्रेकरूंची परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांनी शुक्रवारी दिल्लीत भेट घेतली. या भेटीदरम्यानचे फोटो मंत्री एस.जयशंकर यांनी एक्सवर (ट्विटर) शेअर केले आहेत. या संदर्भातील वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.

## दिशा सालियानप्रकरणी हायकोर्टात सुनावणी पूर्ण, निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियनच्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात तिच्या वडिलांमार्फत याचिका दाखल करण्यात आली असून याचिकाकर्ते सतीश सालियन यांच्या याचिकेवर सुनावणी सुरू आहे. याप्रकरणी, हायकोर्टाने मुंबई पोलिसांच्या तपासावर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. एका वडिलांनी आपली मुलगी गमावली आहे, या अत्यंत संवेदनशील दृष्टीनेच आम्ही या प्रकरणाकडे पाहत असल्याचे न्यायालयाने म्हटले होते. त्यानंतर, आज सरकारी वकील आणि आदित्य ठाकरेंच्या वकिलांकडून युक्तिवाद करण्यात आला. दोन्ही युक्तिवादानंतर याप्रकरणाची सुनवणी पूर्ण झाली असून निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, ही याचिका राजकीय हेतुने प्रेरीत असल्याचं ठाकरेंच्या वकिलांनी म्हटलं आहे.

दिशा सालियन मृत्यूप्रकरणात दिशावर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा गुन्हा दाखल करण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. याप्रकरणी, मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणी पूर्ण झाली असून न्यायालयाने निर्णय राखून ठेवला आहे. त्यामुळे, याप्रकरणात न्यायलय नेमकं काय निकाल देतंय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्यासमोर आज सुनावणी झाली. आजही सरकारी वकील शिशिर हिरे यांचा युक्तिवाद पाहायला मिळाला. गुरुवारी झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने आजवरच्या तपासावर प्रश्नचिन्हे उपस्थित केल होते. तसेच अजूनही एफआयआर दाखल करून तपास करू शकता असं निरीक्षणही नोंदवलं होत. याप्रकरणी राजकारण्यांविरुद्ध केलेल्या तक्रारीत आम्हाला काही रस नसून एका वडिलांनी आपली मुलगी गमावली आहे, याच दृष्टीने आम्ही या प्रकरणाकडे बघतो असं न्यायालयाने म्हटल्यामुळे आजच्या सुनावणीकडे सगळ्यांचं लक्ष लागले आहे.

दिशा सालियनच्या मृत्यूप्रकरणी दिशाच्या वडिलांनी याचिका दाखल केली होती. याप्रकरणी दाखल याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयात राणेंच्या नावाचा उल्लेख करण्यात आला. माझ्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी ही याचिका दाखल करण्याचं प्रकरण घडवून आणलं आहे, त्यात राणे त्यांची मुलं आणि राष्ट्रीय मीडियामधील एक व्यक्ती (अर्णब गोस्वामी) आहेत, असे युक्तिवाद आदित्य ठाकरेंचे वकील सिनिअर काउन्सिल सुदीप पासबोला यांनी केला. मात्र, ही याचिका टिकण्यायोग्य नाही. आम्हाला दिशाच्या वडिलांबद्दल पूर्ण सहानभूती आहे, त्यांना क्लोजर मिळाला पाहिजे या मताचे आम्हीही आहोत. मात्र, याचिकेत ज्या काही मागण्या करण्यात आलेल्या आहेत, त्या टिकण्यायोग्य नाहीत. कारण, माझ्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांची ही खेळी आहे, ही याचिका तथ्यांना धरून नाही. वाट्टेल ते आरोप करत राजकीय वैर साध्य करण्यासाठी याचिका करण्यात आली आहे, असा युक्तिवाद आदित्य ठाकरेंच्या वकिलांनी केला.

## अजितदादांच्या अपघात प्रकरणी व्हीएसआरला वाचवण्याचे प्रयत्न कोण करते? -रोहित पवार

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूला आज सात महिने पूर्ण झाले आहेत. २८ जानेवारी २०२६ ला अजित पवार यांचा बारामती विमानतळावर विमान उतरत असताना अपघाती मृत्यू झाला. बारामती विमानतळावर उतरत असताना धावपट्टीजवळच विमानाला अपघात झाला. विमान खाली कोसळलं आणि विमानाने पेट घेतला. २८ जानेवारीच्या सकाळी पावणेनऊच्या सुमारास हा अपघात झाला. अजित पवारांच्या मृत्यूमुळे संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला. व्हीएसआर या कंपनीच्या विमानाने अजित पवार प्रवास करत होते. आता याच व्हीएसआर कंपनीबाबत आपण मोठा खुलासा पुराव्यांसकट करणार असल्याचं रोहित पवार यांनी जाहीर केलं आहे.

अजितदादांना जाऊन आज सात महिने पूर्ण झाले आहेत परंतु ना सीआयडीचा तपास पुढे सरकला ना सीबीआयकडे तपास दिला गेला. साधा एफआयआर सुद्धा नोंद झाला नाही, एवढेच नाही तर कर्नाटकात नोंद झालेला एफआयआर देखील महाराष्ट्र सरकारने वर्ग केलेला नाही. व्हीएसआरला वाचवण्यासाठी एवढी धडपड (पान ४ वर)

## दिल्लीनंतर आता नाशिकच्या कांद्याची चेन्नईकडे रवानगी

नाशिक दि.२८ (प्रतिनिधी)- देशभरात साखरेनंतर कांद्याचे भावही अचानक वाढल्याने सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने नाफेडच्या माध्यमातून कांदा खरेदीचा निर्णय घेतला आहे. त्याच पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याच्या लासलगाव येथून पहिली कांदा एक्सप्रेस दिल्लीला पोहोचली आहे. आता, लासलगाव पाठोपाठ मनमाड येथूनही कांदा एक्सप्रेस धावणार असून ८०० टन कांदा घेऊन कांदा एक्सप्रेस चेन्नईला जाणार आहे. मनमाड रेल्वे स्थानकात २१ बोगीमध्ये कांदा भरण्याचे काम सुरू असून संध्याकाळपर्यंत कांदा एक्सप्रेस चेन्नईसाठी रवाना होईल. यामध्ये, हलक्या प्रतीचा व खराब कांदा लोड होत असल्याचं पाहायला मिळत आहे.

कांद्याच्या भावात वाढ होताच केंद्र सरकारने कांद्याचे भाव नियंत्रणात आणण्यासाठी नाफेड व एनसीसीएफच्या माध्यमातून खरेदी करण्यात आलेला बफर स्टॉक कांदा नाशिक जिल्ह्यातून देशात पाठविण्याचे नियोजन करण्यात आले. दोन दिवसांपूर्वी नाशिकच्या लासलगाव रेल्वे स्थानकातून एक ४५० मेट्रिक टन कांदा घेऊन कांदा एक्सप्रेस दिल्लीच्या दिशेने रवाना झाल्यानंतर आज पुन्हा मनमाड रेल्वे स्थानकातूनही एक कांदा एक्सप्रेस चेन्नईला पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी मनमाडच्या रेल्वेच्या मालधक्क्यातून कांदा भरण्याचे काम सुरू आहे. नाशिक जिल्ह्यातील विविध शहरात नाफेड व एनसीसीएफने साठवून ठेवलेल्या गोदामातून हा कांदा ट्रकमधून आणला जात आहे. सुमारे २१ डब्यांच्या रेल्वेमधून ८०० मेट्रिक टन कांदा संध्याकाळपर्यंत चेन्नईच्या दिशेने रवाना होणार आहे. त्यामुळे कांद्याच्या दरात घसरण होण्याची शक्यता निर्माण झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये काहीशी नाराजी पसरली आहे. शेतकऱ्यांच्या आरोपानंतरही आजही पाठवण्यात येणाऱ्या बफर स्टॉकमधील काहीसा खराब व हलक्या प्रतीचा कांदा कांदा एक्सप्रेस मध्ये लोड केला जातोय. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी दिल्लीला कांदा एक्सप्रेस रवाना होत असताना, प्रहारच्या तालुका अध्यक्षांकडून कांदा एक्सप्रेस अडवण्यात आली होती.

## पुढची लढाई जिंकायची आहे म्हणून तूर्तास थांबायला हवे-कपिल पाटील

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- राज्यातील आदिवासी विद्यार्थी आपल्या रास्त आणि न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. पुण्यापासून तास-दीड तासाच्या अंतरावर असलेल्या मांजरी येथील शासकीय वसतिगृहात चार विद्यार्थी आणि दोन विद्यार्थिनी बेमुदत उपोषणाला बसले आहेत. अस्वस्थ व्हायला यासाठी होतं कारण आज या उपोषणाचा १६ वा दिवस आहे, असे कपिल पाटील म्हणाले.

पुढे बोलताना कपिल पाटील म्हणाले, आनंद यासाठी आहे की, आंबेडकरी चळवळीत पाहिलेली धार आज प्रथमच आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पाहतो आहे. विद्यार्थी आणि त्यांचे नेते अत्यंत आक्रमक, जिद्दी आहेत; पण त्याच वेळी त्यांची मांडणी अतिशय अभ्यासपूर्ण आणि भाषा तितकीच संयत आहे. कुठेही असभ्य वर्तन किंवा आक्षेपार्ह भाषा नाही. हे कौतुकास्पद आहे. काळूराम काका धोदडे यांच्यासोबत मी राहिलो आहे. काळूराम काकांच्या नेतृत्वाखाली आदिवासी एकता परिषदेने आदिवासींची नवी अस्मिता जागी केली. राजेंद्र गावीत आणि के. सी. पाडवी यांच्या नेतृत्वाखाली ४० ते ४५ वर्षांपूर्वी जेव्हा आदिवासी विद्यार्थी संघटनेची आंदोलनं झाली, तेव्हा त्यांनी बरंच काही मिळवून दिलं; परंतु आजच्या या आंदोलनात एक मोठा फरक आहे. हे तरुण अभ्यासात, मेहनतीत आणि वैचारिक मांडणीत फार पुढे गेले आहेत, असे कपिल पाटील म्हणाले.

## राहुल गांधींच्या पुनरागमनासाठी विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवू नका-चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात शासकीय वसतिगृहांच्या प्रवेशातील वयाची अट रद्द करणे, रिक्त पदांची भरती आणि इतर मूलभूत मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे पुणे (मांजरी), नाशिक व नागपूर येथे आंदोलन व आमरण उपोषण सुरु आहे. या मुद्यावरुन काँग्रेसह विरोधकांनी भाजप सरकारवर जोरदार टीका केली आहे. यावर आत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करुन राहुल गांधींचे महाराष्ट्रातील 'रिलाँचिंग' करण्याचा प्रयत्न काँग्रेसने थांबवावा, अशी टीका बावनकुळेंनी केली आहे. सरकार विद्यार्थ्यांशी तीनदा चर्चा करु शकते, गरज पडल्यास चौथ्यांदा नव्हे तर हजारदा संवाद साधण्याचीही तयारी ठेवत असल्याचे बावनकुळे म्हणाले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा केली आहे. त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेत लिखित आश्वासनही दिल्याची माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. सरकार विद्यार्थ्यांशी तीनदा चर्चा करु शकते, गरज पडल्यास चौथ्यांदा नव्हे तर हजारव्यांदा संवाद साधण्याचीही तयारी ठेवते. मग प्रश्न सुटण्याच्या मार्गावर असतानाही आंदोलन सुरू ठेवण्याचा हट्ट का? असा सवाल देखील बावनकुळेंनी उपस्थित केला आहे. विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राहुल गांधींच्या पुढील महाराष्ट्र दौऱ्यापर्यंत आंदोलन पेटते ठेवण्याचा काँग्रेसचा डाव हा आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा प्रकार असल्याची टीका बावनकुळेंनी केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुविधा आणि शैक्षणिक (पान ४ वर)

# ज्ञानप्रकाशच्या विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना बांधल्या राख्या



छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) – पोलीस खाते हे राज्यातील तसेच देशातील अत्यंत महत्त्वाचे सुरक्षा खाते असून, पोलीस अधिकारी व कर्मचारी रात्रंदिवस जागून सर्वसामान्य नागरिकांचे संरक्षण करीत असतात. अनेकदा त्यांना आपल्या कर्तव्यामुळे रात्री–अपरात्रीही सेवा बजावावी लागते. समाजातील बदलत्या परिस्थितीत मुला–मुलींच्या सुरक्षिततेची जबाबदारीही पोलीस बांधव आपल्या लेकरांप्रमाणेच पार पाडत आहेत.

पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच पोलीस आणि समाजातील स्नेह, जिव्हाळा व बंधुभाव अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने ज्ञानप्रकाश विद्यामंदिर, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थिनींनी अनोखा रक्षाबंधन सोहळा साजरा केला.

रक्षाबंधनाच्या एक दिवस अगोदर विद्यार्थिनींसाठी शाळेत स्वतःच्या हाताने राख्या बनविण्याची विशेष कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सुंदर राख्या तयार केल्या. त्यानंतर या राख्या जवाहरनगर पोलीस स्टेशनमधील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना बांधण्यात आल्या.

यावेळी विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना राखी बांधून त्यांच्या दीर्घ सेवेला मनापासून अभिवादन केले. राखी बांधताना पोलीस बांधवांच्या चेहऱ्यावरही आनंद आणि आपुलकीचे भाव दिसून आले. या उपक्रमात राखी बांधणाऱ्या विद्यार्थिनी : प्रतीक्षा घुगे, सिद्धी सोनवणे, कार्तिकी चव्हाण, सोनाक्षी बनकर, ज्ञानेश्वरी काळे, आलिशा रोकडे, रुक्सार पठाण , प्रतिभा शेळक सृष्टी सतावन, सृष्टी बोडके, भाग्यश्री परदेशी, अनुष्का काळे आरोही होके, सोजल जाधव, संस्कृती निंबाळकर, तेजल गुरु भैया, पायल काळे, श्रावणी चोपडे, विशाखा गरड, इत्यादी विद्यार्थिनी उपस्थित होत्या ज्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना विद्यार्थिनींनी राख्या बांधल्या :

१) सचिन कुंभार पोलीस निरीक्षक जवाहर नगर पोलिस स्टेशन, रावसाहेब वाघ पोलीस उपनिरीक्षक जवाहर नगर पोलिस स्टेशन, राधा लाटे पोलीस उपनिरीक्षक जवाहर नगर पोलिस स्टेशन, रवी कुमार गादेकर पोलीस उपनिरीक्षक जवाहर नगर अनिल भाले इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जवाहरनगर पोलीस स्टेशनचे प्रमुख सचिन कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ज्ञानप्रकाश विद्यामंदिरचे संस्थापक–अध्यक्ष एस. पी. जवळकर, प्रदीप विखे, प्रकाश नागरे तसेच महिला शिक्षिका उपस्थित होत्या.

रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून समाजाचे संरक्षण करणाऱ्या पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थिनींनी आयोजित केलेला हा आनंदमय रक्षाबंधन सोहळा अत्यंत भावनिक आणि संस्मरणीय ठरला. पोलीस हे केवळ कायदा–सुव्यवस्था राखणारे कर्मचारी नसून समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असलेले आपले बांधव आहेत, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# प्रवासी सुविधासाठी वैजापूर एस. टी.आगारातून लांब पल्ल्याच्या बसेस सोडा -प्रवासी मागणी



वैजापूर, दि. २८ (प्रतिनिधी) : वैजापूर शहरातून दररोज शेकडो नागरिक मुंबई, पंढरपूर, पुणे, मालेगाव, धुळे, श्रीरामपूर, अहिल्यानगर आदी शहरांकडे प्रवास करतात. मात्र या महत्त्वाच्या मार्गांवर वैजापूर एस.टी. आगारातून थेट बससेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे वैजापूर आगारातून लांब पल्ल्याच्या नवीन बसफेऱ्या सुरू कराव्यात, तसेच यापूर्वी बंद करण्यात आलेली पुणे बससेवा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात आली आहे.

यासंदर्भात शहरातील नागरिकांनी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीची दखल घेत नगराध्यक्षांनी संबंधित प्रशासनाकडे बससेवा सुरू करण्याबाबत पत्र दिले आहे. त्यानंतर शुक्रवारी (दि. २८) वैजापूर येथील प्रवाशांनी हे पत्र वैजापूर एस.टी. आगाराचे प्रभारी डेपो मॅनेजर गोपाल पगारे यांच्याकडे सादर केले.

प्रवासी संघटनेचे सल्लागार व ज्येष्ठ नागरिक धोंडीराम सिंह राजपूत आणि डॉ. संतोष गगवाल यांनी प्रभारी डेपो मॅनेजर गोपाल पगारे यांची भेट घेऊन प्रवाशांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधले. वैजापूर आगारातून बंद करण्यात आलेली पुणे बस पुन्हा सुरू करावी, तसेच लांब पल्ल्याच्या नवीन बसफेऱ्या सुरू करून ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. संबंधित निवेदन विभागीय नियंत्रक, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडेही पाठविण्याची विनंती करण्यात आली.

**श्रीरामपूरमार्गे पुणे बस सुरू करण्याची मागणी**

वैजापूरहून श्रीरामपूरमार्गे अहिल्यानगर आणि पुढे पुणे अशी बससेवा सुरू झाल्यास या मार्गावरील अनेक गावांतील प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे. सध्या पुणे, अहिल्यानगर आणि परिसरातील शहरांमध्ये शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसेच विविध शासकीय व खासगी कामांसाठी जाणाऱ्या नागरिकांना अनेकदा प्रवासाची साधने बदलावी लागतात. त्यामुळे वेळ आणि आर्थिक खर्च दोन्ही वाढतात.

# उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे पंचवीस हजार राख्यांचे वाटप



पुणे दि. २८ (प्रतिनिधी) – बहिण – भावातील पवित्र नात्याच्या बांधिलकीची जाण ठेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई संजय भिसे यांनी पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील पंचवीस हजार कुटुंबियांना उन्नती सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून राख्यांचे घरपोच वाटप केले.

याव्यतिरिक्त देशाच्या संरक्षणासाठी सदैव तत्पर असलेले जवान, सफाई कामगार, पोलिस कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, प्रशासकीय सेवेतील अधिकारी तसेच समाजाच्या विविध घटकातील पुरुषांना बंधुत्वाच्या नात्याने त्यांच्या मनगटावर राख्या बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला.

सध्या देशभर रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'पंच परिवर्तन'व्दारे जे विविध सामाजिक समरसतेचे उपक्रम राबवले जात आहेत. त्यापासून प्रेरणा घेत समाजातील विविध घटकांना जोडणारा हा रक्षाबंधनाचा हा कार्यक्रम हाती घेतल्याचे डॉ. कुंदाताई भिसे यांनी सांगितले.

# पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीच्या माध्यमातून १३ हजार ११९ पदांसाठी उमेदवारांची शिफारस

मुंबई, दि. २७ : पवित्र पोर्टलमार्फत राबविण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत मुलाखतीशिवाय या प्रकारात निवडीसाठी एकूण १३ हजार ११९ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या भावी शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, आदिवासी विकास विभागाच्या शासकीय शाळा, महानगरपालिका/ नगरपालिका, शासकीय विद्यानिकेतन तसेच खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमधील शिक्षक पदभरतीसाठी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (ढअखढ–२०२५) आयोजित करण्यात आली होती. या प्रक्रियेअंतर्गत मुलाखतीशिवाय निवड प्रकारातील गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली असून विविध व्यवस्थापनांमधील एकूण १३ हजार ११९ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे.

मंत्री दादाजी भुसे म्हणाले, गुणवत्तेच्या आधारे पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित प्रक्रियेतून निवड झालेल्या या उमेदवारांवर विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करताना विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्ये आणि मूल्यांची जडणघडण करण्यासाठी शिक्षकांनी समर्पित भावनेने कार्य करावे. राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी नव्याने निवड झालेल्या शिक्षकांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि गुणवत्ताधिष्ठित पद्धतीने राबविण्यात येत असून निवडीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना त्यांच्या लॉगिनवर निवडीची स्थिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच संबंधित उमेदवारांना एसएमएसद्वारेही माहिती कळिवण्यात येत असल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत कळिवण्यात आले आहे.

व्यवस्थापन निहाय शिफारस झालेली पदसंख्या पुढीलप्रमाणे – जिल्हा परिषद ८४८१, नगरपालिका / परिषदा २२६, महानगरपालिका १३०६, आदिवासी विकास विभाग शासकीय शाळा १६०१, शासकीय विद्यानिकेतन ५४, खाजगी शैक्षणिक संस्था १४५१. तर पद प्रकार निहाय शिफारस झालेली पदसंख्या पुढीलप्रमाणे – इयत्ता पहिली ते पाचवी ७५४१, इयत्ता सहावी ते आठवी ४२०७, इयत्ता नववी ते दहावी ११९९, इयत्ता अकरावी ते बारावी २५२ अशा एकूण १३ हजार ११९ पदांसाठी उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे.

# कुणबी प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेत सुसूत्रता आणा - जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील



छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) – कुणबी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत अधिक सुसूत्रता आणून ती सुलभ, पारदर्शक व गतिमान करण्याच्या सूचना जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या प्रकरणांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत स्मार्ट सिटी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह आठही जिल्ह्यांतील जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष, सदस्य व सदस्य सचिव उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीद्वारे उपविभागीय अधिकारी व संबंधित अधिकारी सहभागी झाले.

डॉ. विखे पाटील यांनी सांगितले की, कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत उपलब्ध नोंदी व कागदपत्रांच्या आधारे संबंधित व्यक्तीची वंशावळ तसेच सादर केलेल्या पुराव्यांची सुसंगती स्पष्टपणे तपासावी. महसुली कागदपत्रे, शैक्षणिक पुरावे तसेच इतर उपलब्ध अभिलेखांच्या आधारे वंशावळ निश्चित करण्याची कार्यवाही सुसूत्रपणे करावी. नागरिकांकडून नियमानुसार आवश्यक तीच कागदपत्रे मागवून प्रक्रिया सुलभ ठेवावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

वंशावळ निश्चित करताना मोडी लिपीतील नोंदी, जुन्या अभिलेखांमधील नोंदी, आडनाव नसलेल्या अभिलेखांबाबत तसेच स्थलांतरामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा बैठकीत आढावा घेण्यात आला. मोडी लिपीतील नोंदींचे तज्ज्ञांकडून भाषांतर करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. इतर जिल्ह्यांमध्ये किंवा शेजारील गावांमध्ये संबंधित नोंदी उपलब्ध असल्यास तेथील अभिलेखांचा संदर्भ घेऊन वंशावळ व नातेसंबंधाची खातरजमा करण्याची कार्यपद्धती स्पष्ट ठेवावी, असे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत अधिक समन्वय ठेवण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या. उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तपासण्यात आलेली संबंधित कागदपत्रे जात वैधता समितीला उपलब्ध करून देत दोन्ही प्रक्रियांमध्ये अधिक समन्वय साधावा. ऑनलाइन प्रक्रियेचा प्रभावी वापर करून नागरिकांना वेळेत सेवा मिळेल, यासाठी कार्यपद्धती अधिक सुलभ करावी. विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरांच्या माध्यमातून जात वैधता प्रमाणपत्राची कार्यवाही सुलभ करण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत विविध प्रकरणांच्या कार्यवाहीचाही आढावा घेण्यात आला. जुन्या अभिलेखांतील नोंदी, त्यांचे भाषांतर तसेच उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे वंशावळ निश्चित करण्याच्या प्रक्रियेबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

आवश्यकतेनुसार मूळ अभिलेख मागवून त्याची पडताळणी करून तसेच तज्ज्ञांकडून भाषांतराची खातरजमा करून नियमानुसार प्रकरणांचा निर्णय घेण्यात येत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रक्रियेची स्पष्ट माहिती तसेच आवश्यक कागदपत्रांची यादी सहज उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही डॉ. विखे पाटील यांनी दिल्या.

# कचनेर येथे 'दक्षिणेचे महावीरजी' मंदिराचा शिलान्यास सोहळा उत्साहात

## देशभरातून हजारो भाविकांची उपस्थिती; चिंतामणी पार्श्वनाथ मंदिराच्या भव्य उभारणीचा शुभारंभ



छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) – कचनेर येथील सुप्रसिद्ध श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्रात 'दक्षिणेचे महावीरजी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या भगवान चिंतामणी पार्श्वनाथ यांच्या भव्य मंदिराच्या बांधकामाचा शिलान्यास सोहळा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. परमपूज्य दिगंबराचार्य चर्याशिरोमणी पट्टाचार्य श्री १०८ विशुद्ध सागरजी महाराज यांच्या पावन आशीर्वादाने व प्रेरणेने झालेल्या या सोहळ्यास देशभरातून हजारो जैन श्रावक–श्राविका व धर्मानुरागी भाविक उपस्थित होते.

खंडित मूर्ती स्वतः जोडली गेल्याच्या अद्भुत इतिहासामुळे कचनेर क्षेत्राला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. याच पवित्र भूमीत भव्य मंदिराच्या उभारणीचा शुभारंभ झाल्याने भाविकांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण होते.

प्रतिष्ठाचार्य श्री चंद्रकांत गुंडप्पा पंडित (इंडी) यांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रोक्त मंत्रोच्चारात शिलान्यासाचे धार्मिक विधी पार पडले. सकाळी ५ वाजता मांगलिक विधान, भूमिशुद्धी व शिलाशुद्धी विधानाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. सकाळी ८ वाजता मुख्य शिलान्यास सोहळा झाला. मंत्रोच्चार, ढोल–ताशांचा गजर आणि भगवान पार्श्वनाथांच्या जयघोषात पवित्र शिलेची स्थापना करण्यात आली.

सोहळ्यानंतर सकाळी १०.३० वाजता उपस्थित भाविकांसाठी वात्सल्य भोज व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिराच्या निर्माणकार्यात पुण्यार्जन करण्यासाठी भाविकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्व. डॉ. सुगनचंदजी केवलचंदजी कासलीवाल यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ व श्रीमती मंगलादेवी यांच्या प्रेरणेने श्री संजयजी व सौ. मेघाजी कासलीवाल तसेच समस्त कासलीवाल परिवार, आडुळवाला (कासलीवाल कन्स्ट्रक्शन, छत्रपती संभाजीनगर) यांनी मंदिर शिलान्यासाचे प्रमुख पुण्यार्जन केले.

महाप्रसादीचे पुण्यार्जन स्व. श्री मोतीलालजी व प्रकाशचंदजी पहाडे यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ व श्रीमती प्रतिभाजी यांच्या प्रेरणेने श्री अभिजीतजी–सौ. श्रुतीजी, श्री अंकितजी–सौ. प्रज्ञाजी, श्री सौरभजी–सौ. प्रियंकाजी, चि. अर्णव, चि. आदित, चि. चिरायु, चि. आरव, कु. अजिता व समस्त पहाडे परिवार, कौलाना–मालेगाव यांनी केले.

श्री चिंतामणी पार्श्वनाथ भगवंतांची वेदी व भगवानजी विराजमान करण्याची स्वीकृती पुण्यार्जक परिवार होण्याचा मान श्रीमान सुनीलकुमारजी सुंदरलालजी पाटणी परिवार अंधारी, छत्रपती संभाजीनगर यांना प्राप्त झाला तर श्री आदिनाथ भगवंतांची वेदी व भगवानजी विराजमान करण्याचा पुण्यार्जक परिवार श्रीमान निलम कुमारजी चंपालालजी अजमेरा परिवार उस्मानाबाद यांना प्राप्त झाला. प्रत्यक्ष उपस्थित राहता न आलेल्या भाविकांसाठी 'चिंतामणी दर्शन Live Stream' या YouTube माध्यमातून सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्यामुळे देश–विदेशातील भाविकांनाही या ऐतिहासिक धार्मिक सोहळ्याचा लाभ घेता आला. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विश्वस्त मंडळ , कार्यकारीणी मंडळ, सकल जैन समाज आणि कचनेर ग्रामस्थांनी परिश्रम घेतले. हा सोहळा भावी पिढ्यांसाठी आस्था, संस्कृती आणि धर्मसंरक्षणाची अजरामर प्रेरणा ठरणारा आहे.

# संत तुकाराम विद्यालयात रक्षाबंधन सोहळा उत्साहात



छत्रपती संभाजीनगर, दि. २८ (प्रतिनिधी) – डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, सिडको एन–७ येथील संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूलमध्ये बहिण–भावाच्या अतूट प्रेमाचे प्रतीक असलेला पवित्र रक्षाबंधन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे, संस्थेच्या सचिव श्रीमती संगीता खिल्लारे, मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांच्यासह शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शालेय विद्यार्थिनींनी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे व मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांचे औक्षण केले.

त्यानंतर त्यांना राखी बांधून पेढा भरविण्यात आला. यानंतर विद्यार्थिनींनी आपल्या वर्गातील बंधूंना राखी बांधून रक्षाबंधनाचा पवित्र सोहळा साजरा केला. राखी हा केवळ एक धागा नसून बहिण–भावातील प्रेम, आपुलकी, संरक्षण आणि विश्वासाचे प्रतीक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याने संपूर्ण शाळेचे वातावरण आनंदमय व उत्साहपूर्ण झाले होते. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील चौधरी, साहेबराव शिंदे, हर्षल पगारे, विजय पाटील, वैशाली बागुल, शीतल घुगे व रत्नमाला घोरपडे यांनी परिश्रम घेतले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# वितरण सुधारणा व वितरण हानी कमी करण्याच्या योजनांना प्राधान्य द्यावे-खा.संदिपान भुमरे

## जिल्हा विद्युत समितीची बैठक



छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- सुधारित वितरण क्षेत्र योजना तसेच वितरण हानी कमी करण्यासाठी योजनांच्या कामांना गती द्यावी असे निर्देश खा. संदिपान भुमरे यांनी आज दिले. विविध योजनांतील कामांची माहिती संबंधित संसद सदस्य व विधिमंडळ सदस्यांना नियमित द्यावी,असेही खा. भुमरे यांनी सांगितले.

जिल्हा विद्युत समितीची बैठक खा.संदीपान भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली महावितरणच्या परिमंडल कार्यालयात आज पार पडली. बैठकीत ग्रामीण व शहरी भागातील वीजविषयक पायाभूत सुविधांचे बळकटीकरण तसेच वीजगळती कमी करण्यासाठी सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी समितीचे सहअध्यक्ष खा.डॉ.कल्याण काळे, सदस्य तथा नवीन व नवीकरणीय ऊर्जा, ओबीसी बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आ.अंबादास दानवे, आ.सुहास सिरसाठ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे,आ.प्रशांत बंब, आ.रमेश बोरनारे, आ.विलास भुमरे, आ.संजना जाधव, समितीचे संयोजक तथा महावितरणचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर, अधीक्षक अभियंता गोरक्षनाथ सपकाळे, मनीष ठाकरे, बीना सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्य अभियंता कुमठेकर यांनी शहर व जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध योजनांतील कामांची माहिती दिली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०अंतर्गत ४० वीज उपकेंद्रांत पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ प्रस्तावित आहे. त्यापैकी २९ उपकेंद्रांत क्षमतावाढ करण्यात आली आहे. अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मरची १८ पैकी ५ कामे पूर्ण झाली असून ७ कामे प्रगतिपथावर आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० अंतर्गत जिल्ह्यात ११० उपकेंद्रांवरील ७४३ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. त्यापैकी ४८ उपकेंद्रांच्या ३१३ मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प पूर्ण होऊन तेथील कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा होत आहे.

घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी म्हणून सुरू असलेल्या पीएम-सूर्यघर योजनेत जिल्ह्यातील ४८ हजार ९५० ग्राहकांनी १७१ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच घरावर उभारले आहेत. दारिद्र्यरेषेखालील ग्राहक व १०० युनिटपेक्षा दुर्बल आर्थिक घटकातील ग्राहकांसाठी सुरू करण्यात आलेल्या स्वंयपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप (स्मार्ट) योजना सुरू करण्यात आली आहे. स्मार्ट योजनेत जिल्ह्यातील १२ हजार ३९७ ग्राहकांना सौर ऊर्जा संच बसवण्याचे लक्ष्य आहे. यात बीपीएल ग्राहकांना २ हजार ५०० रुपये, एससी-एसटी ग्राहकांना ५ हजार रुपये तर सर्वसाधारण दुर्बल घटकातील ग्राहकांना केवळ १० हजार रुपयांत १ किलोवॅट सौर ऊर्जा संच बसवून २५ वर्षे मोफत वीज मिळवण्याची संधी आहे. या दोन्ही योजनांचा चांगला प्रसार करावा,असे खा.भुमरे यांनी सांगितले.

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत प्रलंबित अर्ज निकाली काढा, अतिभारित रोहित्रांच्या ठिकाणी अतिरिक्त रोहित्रे बसवा, शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा करा, अशा सूचना खा. भुमरे यांनी केल्या

सर्व लोकप्रतिनिधींच्या सूचनांची दखल घेऊन योजनांना गती देण्यासाठी व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण कायम तत्पर राहील, असे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांनी सांगितले. बैठकीस महावितरणचे कार्यकारी अभियंता राजेंद्र नाहटा, प्रेरणा बनकर, गिरीश गायकवाड, प्रसाद महातोले, महेंद्र देशमुख, विनय घनबहादूर, अशोक जाधव, रमेश वाघचौरे, अविनाश राऊत उपस्थित होते.

# तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांच्या उपचारांना गती मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ आरोग्याला प्राधान्य

मुंबई दि.२८ (प्रतिनिधी)- गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून योग्य आहार व देखरेखीद्वारे माता व नवजात शिशुचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. रक्तक्षयामुळे प्रसूतीदरम्यान/नंतर मातेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तीव्र रक्तक्षय हे माता व नवजात शिशु मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हीच समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१५ मध्ये आरोग्य विभागाला आयर्न सुक्रोजच्या माध्यमातून ॲनिमियावरील उपचार राबविण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील गरोदर मातांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात विभागाने तीव्र रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आयर्न सुक्रोजचा सिद्ध आणि परिणामकारक उपचार पोहोचविण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील गरोदर मातांनाही तीव्र रक्तक्षय विशेष उपचार सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ व बाल आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यरत आहे. तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना वेळेत उपचार, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नांमुळे सुरक्षित मातृत्वाचा पाया अधिक भक्कम होत आहे.

तीव्र रक्तक्षयावर आयर्न सुक्रोज तसेच फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. एचएमआयएस अहवालानुसार चालू वर्षात (२०२६-२७ जुलैअखेर) नोंद झालेल्या एकूण मातांपैकी तपासणीअंती २३५२४ गरोदर मातांची तीव्र रक्तक्षय असलेल्या अतिजोखमीच्या माता म्हणून निदान झाले आहे. त्यापैकी २१३३७ मातांना आयर्न सुक्रोज किंवा फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) द्वारे उपचार देण्यात आले असून उपचाराचे प्रमाण ९१ टक्क्यांवर पोहोचले आहे.

गरोदरपणातील तीव्र रक्तक्षयामुळे माता आणि गर्भाच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे या समस्येचे वेळीच निदान करून उपचार देणे, उच्च जोखमीच्या मातांचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि उपचारानंतर पुनर्तपासणी करणे यावर राज्य शासनाने विशेष भर दिला आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेमार्फत ‘तपासणी-निदान-उपचार-पुनर्तपासणी’ही साखळी अधिक परिणामकारक करण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या ‘ॲनिमिया मुक्त भारत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१८-१९ पासून प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्यावरील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना आयर्न सुक्रोज इंजेक्शनद्वारे उपचार देण्यात येत होते. सन २०२४-२५ पासून राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयर्न सुक्रोजसोबत, अधिक प्रभावी असलेले इंजेक्शन फेरीक कार्बोक्सी माल्टोजही उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे उपचारांचे पर्याय वाढले असून पात्र मातांना गरजेनुसार जलद व प्रभावी सेवा देणे शक्य झाले आहे.

उपचार पद्धतीचा प्रभावी आणि सुरक्षित वापर व्हावा, यासाठी जानेवारी २०२६ मध्ये राज्यस्तरावर वैद्यकीय अधिकारी व संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांचे ऑनलाइन प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच औषधांचा पुरेसा साठा, वेळेत संदर्भ सेवा आणि उच्च जोखमीच्या गरोदर मातांची स्वतंत्र नोंद ठेवून उपचार पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्याचे आरोग्य विभागांकडून नियोजन करण्यात आले आहे. या वर्षात जिल्हानिहाय कामगिरीत अनेक जिल्ह्यांनी उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे. अहिल्यानगर, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, रत्नागिरी, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यात १०० टक्के तीव्र रक्तक्षयाच्या मातांना उपचार देण्यात आले आहेत. नागपूर, सिंधूदुर्ग, गोंदिया, छत्रपती संभाजीनगर, पुणे, हिंगोली, जालना, धाराशिव व ठाणे या जिल्ह्यांनी ९५ ते १०० टक्क्यांपर्यंत तीव्र रक्तक्षयाच्या मातांना उपचार देऊन साध्य पूर्ण केले आहे. ही कामगिरी राज्यातील मातृ आरोग्य यंत्रणेची तत्परता आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे शक्य होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातही उपचार सेवा प्रभावीपणे पोहोचत आहे. लातूर, नाशिक, भिवंडी, कोल्हापूर, उल्हासनगर, नांदेड-वाघाळा, नवी मुंबई, सोलापूर, चंद्रपूर, परभणी व सांगली-मिरज कुपवाड या क्षेत्रांमध्ये उपचारांचे प्रमाण १०० टक्के आहे. इतर सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये पात्र मातांपर्यंत उपचार वेळेत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पाठपुरावा करण्यात येत आहे. उपचारांचे प्रमाण तुलनेने कमी असलेल्या नंदुरबार, सोलापूर, गडचिरोली, पालघर, नाशिक आणि भंडारा या जिल्ह्यांसाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. या भागांमध्ये जिल्हानिहाय उद्दिष्टे निश्चित करून आशासेविका, आरोग्यसेविका, वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत उपचार कव्हरेज वाढविण्यावर भर दिला जात आहे. शिवाय सार्वजनिक आरोग्य विभागाने तीव्र रक्तक्षय असलेल्या सर्व गर्भवती महिलांना त्यांच्या हिमोग्लोबिनची पातळी वाढविण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आयर्न सुक्रोज/फेरिक कार्बोक्सि माल्टोज इंजेक्शन देण्यासाठी जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ अखेर विशेष मोहीम राबविली आहे. गरोदर मातांवर रक्तक्षयाचे उपचार नेहमी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीच करावी लागतात.

गर्भधारणेची नोंद होताच प्रत्येक महिलेची हिमोग्लोबिन तपासणी, आयर्न-फॉलिक ॲसिडच्या नियमित सेवनाबाबत समुपदेशन, पोषक व लोहयुक्त आहाराची माहिती आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञांकडे संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. एचएमआयएस अहवालाच्या माध्यमातून जिल्हा व तालुकानिहाय तपासणी, निदान आणि उपचाराच्या प्रगतीचे नियमित विश्लेषण केले जात आहे.

### आयर्न सुक्रोजचे / फेरिक कार्बोक्सि माल्टोज इंजेक्शनचे फायदे

* रक्तातील हिमोग्लोबिन आणि शरीरातील लोहाचा साठा वेगाने वाढवण्यास मदत होते.
* रक्तातील ऑक्सिजनचा पुरवठा सुधारल्याने ऊर्जा मिळते. मरगळ व थकवा कमी होतो.
* तोंडाव्दारे देण्यात आलेल्या आयर्न (लोहयुक्त) गोळ्यांमुळे होणारा मळमळ किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास या इंजेक्शनमुळे टाळता येतो.
* गर्भधारणा व किडनीच्या आजारात याचा उपयोग चांगला होत आहे. तीव्र अशक्तपणा किंवा दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजाराच्या (CKD)RELATED समस्या असलेल्या महिलांवर उपचारासाठी आयर्न सुक्रोज फायदेशीर आहे.
* या उपचार पद्धतीमुळे हिमोग्लोबिनची पातळी वाढवून अकाली प्रसूती, प्रसूती दरम्यान/नंतर रक्तस्त्राव, माता मृत्यू यासारख्या समस्या कमी होण्यास मदत होते.

# राज्यातील पत्रकारांच्या प्रश्नांसाठी सरकारविरोधातील लढा अधिक तीव्र करणार-विजय चोरडिया

## संभाजीनगरमध्ये ‘व्हॉइस ऑफ मीडिया’ची जिल्हा बैठक; संघटनात्मक बांधणीसह कृतिशील कार्यक्रमांची आखणी



छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- राज्यातील पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी ‘व्हॉइस ऑफ मीडिया’च्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष आता अधिक तीव्र करण्यात येणार असून, पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटितपणे लढा उभारण्याची गरज आहे. पत्रकारांचे प्रश्न केवळ निवेदनांपुरते मर्यादित न ठेवता त्यासाठी सातत्याने पाठपुरावा आणि कृतिशील कार्यक्रम राबविण्यात येतील. या लढ्यासाठी राज्यातील प्रत्येक पत्रकाराची साथ आवश्यक आहे, असे प्रतिपादन व्हॉइस ऑफ मीडिया व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विजय चोरडिया यांनी केले.

संभाजीनगर येथे आयोजित ‘व्हॉइस ऑफ मीडिया’च्या जिल्हा बैठकीत पदाधिकारी व सदस्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष कानिप अन्नपूर्णे आणि कार्याध्यक्ष किशोर महाजन यांनी विजय चोरडिया यांचे स्वागत केले.

आपल्या मार्गदर्शनात विजय चोरडिया यांनी पत्रकारांच्या प्रश्नांकडे शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त केली. पत्रकार हा लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असून, समाजातील सामान्य माणसाचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम तो करतो. मात्र हे काम करणाऱ्या पत्रकारांच्या स्वतःच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. पत्रकारांना सुरक्षित वातावरण, सामाजिक सुरक्षा, आरोग्याच्या सुविधा, निवासाची व्यवस्था, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मदत, कौशल्यविकासाच्या संधी आणि सेवानिवृत्तीनंतर आर्थिक आधार मिळणे आवश्यक आहे. या प्रश्नांसाठी संघटनेने व्यापक आणि सातत्यपूर्ण लढा उभारला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकारांच्या प्रश्नांसाठी केवळ सरकारकडे मागण्या मांडणे पुरेसे नाही, तर त्या मागण्यांचा सातत्याने पाठपुरावा करून त्या पूर्ण होईपर्यंत संघर्ष करण्याची भूमिका ‘व्हॉइस ऑफ मीडिया’ने घेतली आहे. राज्यातील पत्रकारांना एकत्र आणून त्यांच्या प्रश्नांना संघटित ताकद देणे, प्रत्येक जिल्ह्यात संघटनात्मक बांधणी मजबूत करणे आणि त्यानंतर स्थानिक पातळीवर पत्रकारांच्या प्रश्नांवर कृतिशील कार्यक्रम उभे करणे, ही पुढील काळातील दिशा असेल, असेही चोरडिया यांनी सांगितले.

दरम्यान, संभाजीनगर जिल्ह्यात संघटनात्मक बांधणीला वेग देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. जिल्हा, शहर आणि तालुका पातळीवरील कार्यकारिणी येत्या आठ दिवसांत घोषित करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाध्यक्ष कानिप अन्नपूर्णे यांनी दिली. संघटनेची रचना पूर्ण झाल्यानंतर संभाजीनगर जिल्ह्यात पत्रकारांच्या प्रश्नांवर आधारित ठोस आणि कृतिशील कार्यक्रम हाती घेण्यात येईल. केवळ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती न करता प्रत्येक पदाधिकाऱ्याने संघटनेच्या कामात सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार असल्याचे अन्नपूर्णे यांनी सांगितले.

कार्याध्यक्ष किशोर महाजन यांनीही संभाजीनगरमध्ये लवकरच अभूतपूर्व अशा उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाची तयारी सुरू असून, कार्यकारिणी जाहीर झाल्यानंतर पत्रकारांच्या स्थानिक समस्यांचा अभ्यास करून त्यावर पुढाकार घेतला जाईल. पत्रकारांच्या प्रश्नांना संघटनेच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पत्रकारांचे घर, आरोग्य, पत्रकारांच्या मुलांचे शिक्षण, पत्रकारांचे स्किलिंग आणि सेवानिवृत्तीनंतरचे जीवन या पंचसूत्रीवर ‘व्हॉइस ऑफ मीडिया’ काम करत आहे. पत्रकारांच्या आयुष्याशी संबंधित या पाचही महत्त्वाच्या प्रश्नांना संघटनेने जागतिक पातळीवर आपल्या कार्याचा केंद्रबिंदू बनवले आहे. या व्यापक कार्याचा भाग म्हणून संभाजीनगरमधील पत्रकारांसाठीही ठोस उपक्रम राबविण्यात येतील. पत्रकारांच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या या कार्याचा आम्हाला अभिमान असून, त्यासाठी स्वतःला झोकून देऊन काम करू, अशी ग्वाही किशोर महाजन यांनी दिली.

बैठकीत उपस्थित पदाधिकारी आणि सदस्यांनीही पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यानंतर संघटनात्मक बांधणी, जिल्हा-शहर-तालुका कार्यकारिणीची घोषणा, पत्रकारांच्या स्थानिक प्रश्नांचे संकलन आणि आगामी कृतिशील कार्यक्रम याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संभाजीनगरमध्ये संघटनेची मजबूत आणि सक्रिय यंत्रणा उभी करून पत्रकारांच्या प्रश्नांसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

या बैठकीस कानिप अन्नपूर्णे, पठाण मेहराज खान, सैयद नदीम सौदागर, बबनराव सोनवणे, सुरेश शिरसागर, संजय हिंगोलीकर, शेख शकील, प्रवीण मुर्डे, हेमंत महाले, गणेश खरात, अनिस शेख, डॉ. शेख अश्वर, रमेश बाबा, नरेश धाबर्डे, सैयद करीम मुनिर, अब्दुल कयूम, किशोर महाजन, यश राज सोनवणे, राजू खंडाळकर, सतीश जाधव, अरुण सुरवडकर, अब्दुल गन्नी शेख, शेख सईद आणि फिरोज पठाण यांच्यासह व्हॉइस ऑफ मीडिया पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटनेची ताकद अधिक वाढवून, संभाजीनगरसह राज्यभर पत्रकारांच्या प्रश्नांवर आक्रमक आणि कृतिशील भूमिका घेण्याचा निर्धार करण्यात आला.

# सोयगावच्या ‘बोगस रजिस्ट्री’ प्रकरणावर खासदार भूमरे आक्रमक; दुय्यम निबंधकाला तात्काळ निलंबित करण्याचे निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालयांच्या कारभारात नियमबाह्य दस्तनोंदणी, बोगस रजिस्ट्री, तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन, कमी मूल्यांकन आणि शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत खासदार संदिपान भूमरे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आक्रमक भूमिका घेतली. जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. या बैठकीस उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, नोंदणी विभागाचे उपमहानिरीक्षक यांच्यासह जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक उपस्थित होते.

सोयगावचे प्रभारी दुय्यम निबंधक दीपक रावळकर यांनी नियम व कायद्यांची पायमल्ली करून शेकडो दस्तांची नोंदणी केल्याच्या तक्रारी बैठकीत गंभीरपणे उपस्थित करण्यात आल्या. विशेष म्हणजे रविवारी शासकीय सुट्टीच्या दिवशी कोणतीही परवानगी नसताना कार्यालय उघडून दस्तांची नोंदणी करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

इतका गंभीर प्रकार समोर आल्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यावर अद्याप ठोस कारवाई का करण्यात आलेली नाही, असा सवाल खासदार भूमरे यांनी उपस्थित केला.

केवळ चौकशी सुरू ठेवून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न तर होत नाही ना? असा थेट सवाल उपस्थित करत, या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करून उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, असे निर्देश खासदार भूमरे यांनी जिल्हाधिकारी विनय गौडा यांना दिले.

जिल्ह्यातील बोगस रजिस्ट्री प्रकरणांमध्ये आतापर्यंत ११ पेक्षा अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती बैठकीत समोर आली. मात्र या गुन्ह्यांमध्ये दस्त लिहून घेणारे आणि लिहून देणारे यांच्यावरच कारवाई होत असून, बोगस किंवा नियमबाह्य दस्ताची अधिकृत नोंदणी करणाऱ्या संबंधित दुय्यम निबंधकावर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही? असा संतप्त सवाल खासदार संदिपान भूमरे यांनी उपस्थित केला.

दस्त नोंदणी करताना संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित होत असेल, तर केवळ दस्त करणाऱ्या नागरिकांवर गुन्हे दाखल करून अधिकारी मात्र कारवाईपासून दूर कसे राहू शकतात, असा सवाल करत सर्व प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्याची भूमिका तपासून त्याला मुख्य आरोपी करण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी स्पष्ट भूमिका भूमरे यांनी मांडली.

‘बोगस दस्त तयार करणाऱ्यांवर गुन्हा आणि तो दस्त अधिकृतरीत्या नोंदविणाऱ्या अधिकाऱ्यावर मात्र कोणतीही जबाबदारी नाही, ही व्यवस्था चालणार नाही,’ अशी भूमिका त्यांनी घेतली.

जिल्ह्यात तुकडेबंदी कायदा व इतर नियमांचा भंग करून नोंदविण्यात आलेले दस्त, नागरिकांकडून प्राप्त तक्रारी, संशयास्पद व्यवहार, नियमबाह्य दस्तनोंदणी, कमी मूल्यांकन (ळर्ह्नीर्ल्ूदह), मुद्रांक शुल्कातील तफावत आणि शासनाच्या महसुलाचे नुकसान होण्याची शक्यता असलेली प्रकरणे यांची सविस्तर माहितीही मागविण्यात आली.

अशा प्रकरणांमध्ये आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली, किती प्रकरणांत फेरतपासणी झाली, किती महसूल वसूल करण्यात आला आणि दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर काय कारवाई झाली, याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

मागील आर्थिक वर्ष आणि चालू आर्थिक वर्षात जिल्ह्यातील प्रत्येक दुय्यम निबंधक कार्यालयात किती दस्त नोंदणीकृत झाले आणि त्यातून शासनाला किती महसूल प्राप्त झाला, याची वर्षनिहाय व कार्यालयनिहाय माहिती मागविण्यात आली. एखाद्या कार्यालयात दस्तनोंदणीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे का, महसुलात अनियमितता आहे का, कमी मूल्यांकनामुळे शासनाचा महसूल बुडाला आहे का, याचीही तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

नोंदणी प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही खासदार भूमरे यांनी दिले. नागरिकांना अनावश्यक हेलपाटे मारावे लागू नयेत, दलालांचा हस्तक्षेप कमी व्हावा आणि प्रत्येक व्यवहारात पारदर्शकता राहावी, यासाठी कार्यालयीन प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला.

दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये मनुष्यबळाची कमतरता, संगणक प्रणाली, इंटरनेट सुविधा, तांत्रिक अडचणी, कार्यालयीन जागा, नागरिकांसाठी उपलब्ध सुविधा आणि इतर प्रशासकीय अडचणी यांचीही माहिती घेण्यात आली.

सोयगावसह जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांतील कामकाजाची सखोल छाननी करण्याची गरज या बैठकीत अधोरेखित झाली. बोगस रजिस्ट्री, नियमबाह्य दस्तनोंदणी किंवा शासनाच्या महसुलाचे नुकसान करणाऱ्या कोणत्याही प्रकरणात संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करावी, अशी स्पष्ट भूमिका खासदार संदिपान भूमरे यांनी घेतली.

# करमाड–लाडसावंगी रस्त्याच्या भूसंपादनाचा मार्ग लवकरच मोकळा होणार

## खासदार संदिपान भूमरे यांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक; तातडीने कार्यवाहीचे आश्वासन

छत्रपती संभाजीनगर दि.२८ (प्रतिनिधी)- करमाड–लाडसावंगी रस्त्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याच्या मागणीसाठी खासदार संदिपान भूमरे यांनी आज जिल्हाधिकारी विनय गौडा यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी परिसरातील शेतकरी बांधवांनीही उपस्थित राहून रस्त्याच्या प्रश्नाबाबत आपल्या अडचणी व मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.

करमाड–लाडसावंगी हा परिसरातील नागरिक, शेतकरी तसेच वाहनधारकांसाठी महत्त्वाचा मार्ग असून, रस्त्याच्या कामासाठी आवश्यक असलेली भूसंपादन प्रक्रिया आणि प्रत्यक्ष काम सुरू होण्यासंदर्भात काही बाबी प्रलंबित आहेत. त्यामुळे या रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लावावे, अशी मागणी खासदार भूमरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच संबंधित प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याचे आणि या प्रश्नातून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे करमाड–लाडसावंगी रस्त्याच्या कामाला गती मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

रस्त्याचे काम पूर्ण झाल्यास या मार्गावरील नागरिक आणि शेतकरी बांधवांच्या दळणवळणाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार असून, परिसराच्या विकासालाही चालना मिळणार आहे. या रस्त्याच्या कामासाठी पुढील काळातही सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, अशी भूमिका खासदार संदिपान भूमरे यांनी यावेळी स्पष्ट केली. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. अविनाश पाटील गलांडे, जिल्हा परिषद गटनेते राधाकिसन पठाडे यांच्यासह परिसरातील सर्व शेतकरी बांधव उपस्थित होते.

(पान १ वरुन)

## नेपाळमधील महापुरातील मृतांची...

सुशील आर्याल यांनी सांगितले की, सध्या मृतदेह २ ते ६ अंश सेल्सिअस तापमानात ठेवले जात आहेत. या तापमानात मृतदेह साधारण १० दिवस ते दोन आठवडे सुरक्षित ठेवता येऊ शकतात. मात्र त्यापेक्षा जास्त काळ साठवणूक करायची असल्यास शून्याखालील तापमान कायम ठेवणे आवश्यक आहे. पोखरामध्ये अशी व्यवस्था सध्या उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णालयाकडे बॉडी बॅग, संरक्षण साहित्य आणि शवविच्छेदनासाठी आवश्यक कर्मचारी पुरेशा प्रमाणात आहेत. मात्र ओळख न पटलेले मृतदेह सातत्याने सापडत राहिल्यास परिस्थिती आणखी कठीण होऊ शकते, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान तिबेटमधील हिमकडा कोसळून झालेल्या विनाशकारी प्रलयात नेपाळमध्ये चिखलात जीवांचा शोध सुरुच असताना आता पुन्हा नव्याने धडकी भरवणारी माहिती समोर आली आहे. पाण्याचा प्रवाह पुन्हा तिबेटच्या दिशेने वाढत असल्याची माहिती समोर आली आहे. नेपाळ सरकारकडून सर्व सुरक्षा कर्मचारी, बचाव पथक आणि मदत व बचाव कार्यात सहभागी असलेल्या सर्वसामान्य जनतेला तात्काळ सतर्क राहून सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लोकांना त्यांच्या जवळच्या लोकांना या धोक्याची माहिती देण्यास आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यास मदत करण्यासही सांगण्यात आले आहे.

## अजितदादांच्या अपघात...

कोण करतय ? का करतंय? हे सर्व ४ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषद घेऊन पुराव्यांसकट सविस्तर सांगेन. असं म्हणत रोहित पवार यांनी पोस्ट केली आहे. आता रोहित पवार ४ सप्टेंबरला पत्रकार परिषदेत काय पुरावे सादर करणार आणि नेमके काय खुलासे करणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर रोहित पवार यांनी सातत्याने पाठपुरावा करत हा मृत्यू म्हणजे घातपात होता का? हे तपासण्यासाठी सीबीआय किंवा सीआयडी चौकशी करा ही मागणी करत पाठपुरावा केला आहे.

‘व्हीएसआर’ विमान कंपनीला तीन महिन्यांत १४५ कोटी रुपये दिले आहेत. अपघाताच्या अगोदरच्या दिवशी १५.७२ कोटी रुपये. अपघाताच्या दिवशी ९.८१ कोटी रुपये आणि अपघाताच्या दुसऱ्या दिवशी १६.८६ कोटी रुपयांचे बिल काढण्यात आले. सर्वसाधारण महिन्याला दहा कोटी रुपयांचे बिल निघत असताना जानेवारी ते मार्च महिन्यांत अचानक इतकी मोठी रक्कम का देण्यात आली हा प्रश्न रोहित पवारांनी याआधी उपस्थित केला होता. तसंच व्हीएसआर कंपनीबाबत त्यांनी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले होते. आता ४ सप्टेंबरच्या पत्रकार परिषदेत के काय पुरावे सादर करणार ते पाहणं महत्त्वाचं असेल.

## राहुल गांधींच्या पुनरागमनासाठी...

संधी वाढविण्यासाठी शासन संवेदनशीलपणे काम करत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य घडविणे हा सरकारचा उद्देश आहे. मात्र काँग्रेसला विद्यार्थ्यांच्या करिअरपेक्षा आपल्या नेत्यांचे राजकीय करिअर वाचवण्याची अधिक चिंता असल्याचे या आंदोलनाच्या निमित्ताने स्पष्ट होत आहे, असा टोला चंद्रशेखर बावनकुळेंनी लगावला.

आदिवासी समाजाच्या प्रश्नांशी खरोखरच काँग्रेसला आस्था असेल, तर त्यांनी विद्यार्थ्यांना राजकीय आंदोलनाचे साधन बनविण्याऐवजी सरकारसोबत संवाद साधावा. आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका आणि आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवू नका अशी टीका बावनकुळेंनी केली. राहुल गांधींच्या राजकीय पुनरागमनासाठी आदिवासी विद्यार्थ्यांचा वापर करणे महाराष्ट्र कदापी स्वीकारणार नाही असेही ते म्हणाले.